**<u>नि.दि.दा.क्र. १९२/२०१६</u>**

प्रदिप वि. संपत

**<u>नि.क्र.१०३ लगत.</u>**

**प्रतिवादी क्र. १ ते ३ तर्फे साक्षीदार क्र.३**

मी सत्यप्रतिज्ञेवर कथन करतो की,

| | | |
|---|---|---|
| नाव | – | विष्णु निवृत्ती चव्हाण |
| वय | – | ५४ वर्षे, |
| व्यवसाय | – | शेती, |
| राहणार | – | मांजरी बु., ता. हवेली, जि.पुणे. |

**<u>उलटतपास वादी तर्फे विधिज्ञ श्री. बी.सी. शेळके यांच्यामार्फत शपथेवर सुरु –</u>**

मी मांजरी येथे १३ वर्षांपासुन राहतो. मोहित रोडलाईन्स या नावाचा माझा ट्रान्सपोर्ट व्यवसाय आहे. मी ट्रान्सपोर्ट व्यवसाय करीत असल्याबाबतची कागदपत्रे मी अभिलेखावर दाखल केलेले नाहीत व मी आज सोबत आणलेले नाही. माझे मुळ गाव खेड आहे. वादातील जमिन मिळकती या औटेवाडी येथील आहेत. हे खरे नाही की, खेड ते औटेवाडी अंतर ५ कि.मी. आहे. सदर औटेवाडी ते खेड मधील अंतर मला सांगता येणार नाही. वादीचे नाव प्रदिप रामचंद्र काळे हे मला माहिती आहे, दुसऱ्या वादीचे नाव मला माहिती नाही. दाव्यात ३ प्रतिवादी आहेत. त्यांची नावे संपत मारुती वाघमारे, चंद्रकांत मारुती वाघमारे, गोपिनाथ मारुती वाघमारे आहेत. याव्यतिरीक्त इतर प्रतिवादींची नावे मला माहिती नाही. माझ्या प्रतिज्ञापत्रात नमुद केलेल्या गट क्र. ३३५ व ३३६ या जमिनी माझ्या मालकीच्या असल्याचा ७/१२ उतारा मी अभिलेखावर दाखल केला नाही. वादीच्या जमिनीचा गट क्र. ३४५ असल्याचे मला माहिती आहे, दुसरा गट मला माहिती नाही. प्रतिवादीच्या मालकीचा गट क्र. ३३४ आहे. गट क्र. ३३४ हा प्रतिवादी क्र. १ ते ३ चा आहे. सुरेश जयसिंग आगवण व चंद्रकांत जयसिंग आगवण हे मला माहिती आहेत. या दोघांच्या जमिनीचा गट क्र. ३३५ आहे. वादी व प्रतिवादींच्या जमिनी खेड गावच्या हद्दीत आहेत. माझ्या जमिनीपासून वादी व प्रतिवादींच्या जमिनी अंदाजे १००० फुट अंतरावर आहे. वादी व प्रतिवादींच्या जमिनीच्या बांधाला बांध लागुन माझी जमिन नाही. प्रतिवादींच्या जमिनीत मी गेल्या आठवड्यात गेलो होतो. त्यापुर्वी मी एक महिन्यापुर्वी गेलो होतो. मी १५ वर्षांपासून प्रतिवादींच्या जमिनीत नेहमी जातो. वादी व प्रतिवादींच्या जमिनीची दोनदा मोजणी झालेली आहे. वादीच्या जमिनीची मोजणी सन २०१६ साली झालेली आहे, तो महिना व तारिख मला सांगता येत नाही. प्रतिवादींच्या जमिनीची मोजणी सन १९९१ साली झाली. सन १९९१ साली माझे वय किती होते हे मला सांगता

येणार नाही. ३ फुटाचा बांध असल्याबद्दल मी स्वतः मोजणी केलेली नाही. बांधावर किती झाडे आहेत हे मला सांगता येणार नाही. ती झाडे कशाची आहेत हे ही मला सांगता येणार नाही. वादीने प्रतिवादीच्या जमिनीत अतिक्रमण केल्याचे मला सन २०२३ साली माहित झाले. संपत वाघमारे यांनी अतिक्रमण केल्याचे सांगितले.

**मध्यान्नाची वेळ झाल्यामुळे उलटतपास तहकुब.**

स.सा.वा.दा.ब.अ.क.केले.

माझे समक्ष,

RAMRAO BABURAO RAUT

Digitally signed by RAMRAO BABURAO RAUT
Date: 2026.01.30 17:13:04 +0530

(आर. बी. राऊत)

दि.३०/०१/२०२६

२ रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, कर्जत.

जि. अहमदनगर